अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# दोन्ही काँग्रेसचे पाय आणखी खोलात

राज्यातल्या सिंचन घोटाळाप्रकरणी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री अजित पवार हे अडचणीत सापडले आहेत. त्यांच्याच शासनाने नेमलेल्या माधवराव चितळे समितीनेसुध्दा अजित पवार यांच्यावर ठपका ठेवला. यावरून या घोटाळ्यावर कायमचे शिक्कामोर्तब झाले असेच म्हणावे लागेल. अहवालामध्ये जलसिंचन प्रकल्पांच्या किमती अवैधपणे वाढवल्या गेल्या आणि तो खर्च इतका अवाढव्य झाला की, शासनाच्या तिजोरीवर थोडाथोडका नाही तर तब्बल सत्तरहजार कोटींचा बोजा पडला. चितळे समितीच्या या अहवालात अनेक गोष्टींचा उहापोह झाल्याचे सांगितले जाते. भारतीय जनता पार्टीच्या वतीने हा अहवाल विधीमंडळात सादर होण्यापूर्वीच अजित पवार यांच्यावर आरोप केले होते. अर्थात यापूर्वी राज्याच्याच महालेखापालांनीसुध्दा जलसिंचन प्रकरणात निविदा मागवून कामे देण्याचे मूलभूत बंधनदेखील पाळले गेले नाही याकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर जलसिंचन खात्यातलेच मुख्य अधिकारी असलेल्या विजय पांढरे यांनी सविस्तर पत्र लिहून जलसिंचनातले काळे व्यवहार उघड केले होते. चितळे समितीने अनेक प्रकल्पांच्या किमती अवैधपणे वाढवल्याचे म्हटले आहे. याचा सरळ अर्थ असा होतो की, वरिष्ठ मंत्र्यांनी मनमानी करून प्रकल्पाच्या किमती वाढवल्या. त्यांना याबाबत पुन्हा निविदा मागवण्याची गरज भासली नाही. शासनाच्या तिजोरीतला पैसा आपण आपल्या पध्दतीने वापरू शकतो असा कुठला तरी एक बेबंदपणा यासगळ्या व्यवहारामध्ये झालेला दिसून येतो. गेले काही दिवस चितळे समितीच्या या अहवालाविषयी चर्चा सुरू होती. त्यात थेट अजित पवारांवर ठपका ठेवला जातो किंवा नाही याबद्दलही अनेक मते व्यक्त झाली होती.परंतु समितीच्या कार्यकक्षा वाढवाव्यात आणि यासंदर्भात झालेला भ्रष्टाचार हा कोणाच्या कार्यकाळात कोणाच्या निर्देशानुसार झाला, हेदेखील उघड व्हावे अशा प्रकारची मागणी विरोधी पक्षांतर्फे केली गेली होती. आता प्रत्यक्ष हा अहवाल विधीमंडळात येत असल्याने त्यातल्या मुद्दांबाबत सरकारला उत्तरे द्यावी लागतील. त्यात गैरव्यवहार झाला हे स्वीकारावेच लागेल अशी एकूण परिस्थिती दिसते. यापूर्वी अजित पवारांवर आरोप झाला. त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली गेली. त्यांनी राजीनामाही दिला होता. मात्र पुन्हा आपल्यावर कोणतेही आरोप सिध्द न झाल्याने त्यांना पुन्हा मंत्रीमंडळात विराजमान करून घेतले गेले होते. पण आता जर का चितळे समितीनेही तोच अभिप्राय व्यक्त केला असेल तर अजित पवारांना नुसतेच राजीनामा देऊन चालणार नाही. तर आगामी निवडणुकांमध्ये त्यांच्या उमेदवारीलादेखील आव्हान दिले जाऊ शकते, हेही त्यांना लक्षात घ्यावे लागेल.

## पुतण्याला कितीवेळा वाचवणार

राज्यातल्या विधानसभा निवडणुका सहा महिन्यावर येऊन ठेपल्या असताना पुन्हा एकदा हा अहवाल चर्चेत आला आहे.लोकसभा निवडणुकीतल्या धुलाईनंतर राष्ट्रवादी काँग्रेसपुढे या अहवालाने नवा राजकीय दणका दिला आहे. बुडत्याचा पाय खोलात या म्हणीप्रमाणे काँग्रेसबरोबर आता राष्ट्रवादी काँग्रेसही या अहवालामुळे पराभवाच्या गर्तेत गटांगळ्या खाईल असे चित्र दिसते. एकतर जलसिंचन प्रकरणात भ्रष्टाचार झाला हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. त्यातली रक्कमही प्रचंड मोठी असल्यामुळे पैसे खाणाऱ्यांनीही व्यवस्थितपणे हात मारण्याचे काम केले हेही सिध्द होते. फक्त या सगळ्या भ्रष्टाचाराला कोणाचा आशीर्वाद होता किंवा त्याला नेमके कोण जबाबदार आहे, हे निश्चित होणे तितकेच गरजेचे ठरते. बऱ्याचवेळेला सरकारी कंत्राटांमध्ये वाटेल तशा किमती लावून सरकारी तिजोरी साफ केली जाते. सगळा भ्रष्टाचार हा संगनमताने होतो आणि कुठलीही एक व्यक्ती त्यात अडकणार नाही, असाही प्रयत्न केला जातो. परंतु आपल्या लोकशाही पध्दतीत संविधानाने काही जबाबदाऱ्याही नक्की केलेल्या आहेत. सगळ्या कामांची अंमलबजावणी सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी जरी करत असले तरी निर्णयांची जबाबदारी ही मंत्र्यांवर येऊन पडते. अनेकवेळेला तर त्यांच्या सहीने निर्णय होतात. प्रकल्पांचे किंवा एखाद्या कामाचे कंत्राट अगदी आपल्या मर्जीतल्या माणसाला देण्याचे हुकूम सोडले जातात. बरीच कामे नियमात बसत नसतानाही नियम बदलण्याचे फर्मानही सोडले जाते. मंत्र्यांचे आदेश म्हटल्यानंतर अनेकवेळेला सरकारी अधिकारी त्याच्यापुढे नांगी टाकतात आणि एकाअर्थी या भ्रष्टाचाराला उत्तेजन देतात. जलसिंचन घोटाळ्यात असेच झाले आहे. केवळ मंत्र्यांच्या दबावामुळे वाटेल त्या प्रकल्पांच्या वाटेल त्या किमती वाढवल्या गेल्या आणि या सगळ्या निर्णयांना मंत्री जबाबदार असल्याचा निष्कर्श चितळे समितीने काढला आहे. चितळेंमुळे पवारांचे पितळ आणखीनच उघडे पडले. त्यामुळे निवडणुकीपूर्वी आलेला हा अहवाल राष्ट्रवादी काँग्रेससाठी नवा भूकंपच म्हटला पाहिजे. लोकसभा निवडणुकीत अनेक प्रकारे प्रयत्न करूनही राष्ट्रवादी काँग्रेस स्वत:चा बचाव करू शकले नाहीत. त्या मोदी लाटेचा प्रभाव अजूनही कायम आहे. महाराष्ट्रात केंद्राप्रमाणे सत्ता परिवर्तन होईल असे राजकीय वातावरण असताना चितळे समितीच्या अहवालाने राष्ट्रवादी काँग्रेसचा पाय आणखीनच खोलात गेला आहे. अजित पवारांना यापूर्वी शरद पवारांनी दोन-तीन वेळा वाचवण्याचा प्रयत्न केला. परंतु पुतण्याला काकांनी कितीवेळा वाचवायचे, असा प्रश्न निर्माण होतो. आता तर पुतण्याला वाचवायचे की पराभवापासून वाचायचे, अशा संभ्रमामध्ये शरद पवार सापडले आहेत.

## लोकांना दिलासा देणारे शासन हवे

विरोधी पक्षांसाठी चितळे समितीचा हा अहवाल म्हणजे एक नवे हाती लागलेले अस्त्रच म्हणावे लागेल. भाजपा सेना महायुतीच्या मोदी लाटेमुळे आशा पल्लवित झाल्या. आता चितळे समितीच्या अहवालाने आणखीनच अनुकूल परिस्थिती निर्माण करून दिली आहे. फक्त आता या सगळ्या वातावरणाचा तितक्याच प्रभावीपणे कसा उपयोग करून घ्यायचा हे कौशल्य महायुतीला दाखवावे लागेल. आता इथेसुध्दा त्यांना केवळ या अहवालाचे राजकारण करता येणार नाही तर त्यांचे सरकार आले तर भ्रष्टाचार होणार नाही, याची ग्वाही त्यांना द्यावी लागेल. निवडणुकीच्या ऐन तोंडावर हा अहवाल आल्याने त्याचा मोठ्या प्रमाणावर राजकीय वापर होईल यात काही शंका नाही. परंतु लोकांना केवळ राजकारणापेक्षा स्वच्छ प्रशासन आणि दिलासा देणारे शासन हवे आहे. या एकाच कारणासाठी लोकांनी नरेंद्र मोदी यांच्या बाजूने मतदान केले. तशी अनुकूलता जर महायुतीला हवी असेल तर त्यांनादेखील राज्यात नरेंद्र मोदींसारखी प्रतिमा असलेला एखादा तरी नेता लागेल.कारण गेल्या दहा वर्षामध्ये राज्यातही अनेक प्रकारची भ्रष्टाचाराची प्रकरणे झाली. आदर्श घोटाळ्यापासून ते या सिंचन घोटाळ्यापर्यंत त्याची बरीच मोठी यादी देता येईल. त्यामुळेच दोन्ही काँग्रेसचा पाय या घोटाळ्यातून अधिकाधिक खोलात गेल्यासारखी स्थिती आहे.